# बँक कर्जव्यवहार पध्दती

**डॉ. कारभारी बबनराव दिवटे**

*उपप्राचार्य, मा.ध.पालेशा वाणिज्य महाविद्यालय, धुळे*

**प्रास्ताविक :**

बँका ठेवी स्वीकारुन आणि इतर बँकाकडून किंवा संस्थाकडून कर्ज घेऊन निधी मिळवितात. यालाच बँकेचे खेळते भांडवल असे म्हणतात. या रकमा परत करणे ही बँकेची जबाबदारी असते. परंतू या रकमांवर बँकेला ठरलेल्या मुदतीत व ठरलेल्या व्याजदराने व्याज द्यावे लागते. हे व्याज या रकमा बँकेत जमा झालेल्या दिवसांपासून देय होते. त्यामुळे या रकमांचा कर्ज देण्यासाठी जेवढा लवकर वापर केला जाईल तेवढे बँकेचे कमी नुकनास होते. जमा होणाऱ्या रकमा व दिली जाणारी कर्जे किंवा करण्यात येणारी गुंतवणूक यात जितका कमी वेळ जाईल तेवढी बँकेची नफा मिळवण्याची क्षमता वाढते. म्हणनूच ठेवी मिळविण्यासाठी बँकेने जसे नियोजन करणे आवश्यक असते तसेच बँकेने कर्ज देण्याचे नियोजन करणे आणि योग्य कर्ज देण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. सध्या स्पर्धात्मक युगात वेगवेगळया लोकांच्या वेगवेगळया गरजा विचारात घेऊन विविध कर्ज योजना तयार केल्या पाहिजे. हे काम मुख्य कार्यालयाप्रमाणेच शाखास्तरावरही करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**कर्जव्यवहाराचे घटक (अंगे) :**

कर्जव्यवहारांची मुख्यता आठ अंगे असतात. त्या दृष्टीकोनातून बँक कर्ज व्यवहाराचा विचार करावा लागतो.

१. **कर्जदार :**

व्यक्ती, व्यक्तीसमुह (संयुक्त कर्जदार), पार्टनरशिप, एकत्रित हिंदू कुटुंब, कंपनी, ट्रस्ट, सोसायटी असे कर्जदारांचे विविध प्रकार असतात. कर्जदाराच्या बाबतीत प्रामुख्याने तीन दृष्टीकोनातून चिकीत्सा करणे आवश्य असते.

अ) स्वनिधी (भांडवल) - कर्जदार जो उद्योग किंवा व्यवसाय करणार असेल त्यात त्याची स्वत:ची २५ ते ३० टक्के रकमेची गुंतवणूक असली पाहिजे किंवा तो ती रक्कम कशी उभी करणार आहे याची काळजीपूर्वक चौकशी केली पाहिजे.

ब) क्षमता (कपॅसिटी) - कर्जदार ज्या व्यवसायासाठी कर्ज घेणार आहे त्याबद्दल त्याला माहिती असली पाहिजे. उदा.-टॅक्सी खरेदी करण्यासाठी कर्ज द्यायचे असेल तर कर्ज मागणाऱ्याकडे टॅक्सी चालविण्याचा परवाना, परमिट असले पाहिजे. तसेच पूर्वीचा टॅक्सी चालविण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

क) चारित्र्य - कर्जदार हा प्रामाणिक असला पाहिजे. कर्जदाराबाबत बँकेला पूर्वीचा अनुभव असेल तर तशी खात्री करुन घेणे सोपे होते. मात्र कर्जदार अनोळखी असेल तर बँकेला कर्जदाराच्या सचोटीची माहिती बाहेरुन मिळविणे आवश्यक असते. म्हणूनच बँक ही बँक खातेदार नसणाऱ्या व्यक्तीला लगेच कर्ज देण्यास तयार होत नाहीत.

वरील तीन गोष्टींची पडताळणी करण्यासाठी बँकेने कर्ज मागणी करणाऱ्या व्यक्तीशी प्रथम चर्चा केली पाहिजे. त्याच्या आर्थिक परिस्थितीबद्दल कागदपत्रे पाहीली पाहिजे. उदा.- इन्कमटॅक्स रिटर्न, सेल्स टॅक्स किंवा वस्तू व सेवा कर रिटर्न, नफा-तोटा पत्रक, जमा -खर्च पत्रक इत्यादी कर्जदाराने एखाद्या व्यवसायाची योजना आखली असेल तर योजनेचा अभ्यास केला पाहिजे. त्याबाबत तज्ञांचे मत घेतले पाहिजे. कर्जदार दुसऱ्या बँकेचा ग्राहक असेल तर त्या बँकेचे मत घेतले पाहिजे. त्या बँकेकडून नाहरकत प्रमाणपत्र मिळविले पाहिजे.

२. **कर्जाचा हेतू :-** कर्ज घेण्याचे मुख्यत: तीन हेतू असू शकतात.

अ) उत्पादन (प्रॉडक्शन) -

लहान व मोठे उद्योजक उत्पादन करण्यासाठी किंवा वाढविण्यासाठी कर्जाची मागणी करतात. जर नविन उत्पादन करणार असेल तर त्या नविन उत्पादनाला बाजारात मागणी येऊ शकेल किंवा नाही. लोकांना अपेक्षित असणाऱ्या गुणवत्तेचे उत्पादन केले जाणार असेल तरच त्या कर्जदाराच्या कर्जाचा विचार करणे श्रेयस्कर ठरते. कारण कर्जदाराचे उत्पादन सहजपणे विकले गेल्या शिवाय कर्जदाराला उत्पन्न मिळणार नाही आणि बॅंकेच्या कर्जाची परतफेडही करता येणार नाही.

ब) व्यापारासाठी कर्ज :-

बँकांनी व्यापाराला कर्ज पुरवठा करावा अशी अपेक्षा असते. बँका ज्या वस्तूंच्या व्यापारासाठी कर्जपुरवठा करणार आहेत त्याबाबत रिझर्व्ह बँकेची काही मार्गदर्शक तत्व आहेत कां याची माहिती करुन घेतली पाहिजे. व्यापारासाठी बँकाकडून कॅश क्रेडिट दिले जाते त्याचे नुतनीकरण केले जाते. बँक व्यापारी मालावर हायपॉथिकेशन पध्दतीने ताबा मिळविते माल बँकेच्या ताब्यात नसल्यामुळे दुय्यम तारण (कोलॅटरल सेक्युरिटी) म्हणून घर तारण, गॅरंटीज इत्यादी घेण्यात येतात.

क) उपभोग (कनझम्शन) कर्ज :-

अशी कर्जे शिक्षण, लग्न, आजार उपचार इत्यादी गरजा भागविण्यासाठी दिली जातात. तसेच उपभोग्य वस्तू घेण्यासाठी दिली जातात. उदा.- फ्रिज, टी.व्ही., वॉशिंग मशिन इ. ही अनुत्पादक कर्जे असतात. त्यामुळे कर्जदार या कर्जाची परतफेड कशी करणार याची चौकशी केली पाहिजे. त्याच्या मासिक किंवा वार्षिक उत्पन्नाचा व घर खर्चाचा अंदाज घेतला पाहिजे. कर्जाचा हप्ता वेळेवर दिला जाईल व कर्जाची फेड पूर्ण होईल याची खात्री करुन घेतली पाहिजे. कर्जासाठी जामिनदार घेणेही आवश्यक आहे. खरेदी केलेल्या वस्तूंवर हायपॉथिकेशनचा चार्ज निर्माण करुन कर्जदारावर बंधन आणले पाहिजे.

**३. कर्जाचे तारण आणि तारणावरील हक्क निर्मिती :**

बँका विनातारण कर्ज देऊ शकतात. परंतू अशी कर्जे कमी कालावधीसाठी आणि मर्यादित रकमेची दिली पाहिजे. (उदा.- क्लिन बिल्स/चेक्स परचेसेस) तसेच अशा कर्जासाठी तिसऱ्या व्यक्तीचा जामिन घेतला पाहिजे. बँकेच्या एकुण विनातारण कर्जाचे प्रमाणही एकुण कर्जाच्या १/३ पेक्षा जास्त होऊ देवू नये. याबाबत रिझर्व्ह बँकेने केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन केले पाहिजे.

तारण कर्जासाठी बँक जे तारण घेते ते तीन प्रकारचे असते.

i) स्पृश्य चल संपत्ती (टॅजिबल मुव्हेबल सेक्युरिटी)

या पध्दतीत बँकेने दुकानातील माल, वाहने, मशीनरी अश्या तारण वस्तूंवर बँकेने प्लेज किंवा हायपॉथिकेशन पध्दतीने अधिकार प्रस्तावित केला पाहिजे.

ii) स्पृश्य अचल संपत्ती (टॅजिबल इम-मुव्हेबल सेक्युरिटी)

घर, जमिन इत्यादी तारणांवर ताबा मिळविण्यासाठी बँकेला त्याचे मॉर्टगेज करावे लागते.

iii) पेपर सेक्युरिटीज

शेअर्स, बिल्स, इन्शुरन्स पॉलिसीज इत्यादी तारणांवर ताबा मिळवण्यासाठी लीन किंवा असाइन्मेंट पध्दतीचा वापर करावा लागतो.

कर्जासाठी तारणाचा विचार करतांना बँकेने हे लक्षात ठेवले पाहीजे की, कर्जातून निर्माण होणाऱ्या वस्तूंचे 'तार ा' घेतलेच पाहीजे उदा.- ट्रॅक्टरसाठी कर्ज दिल्यास ट्रक्टरचे हायपॉथिकेशन करुन घेतले पाहिजे. गोडावून मधील मालसाठयावर कर्ज दिले, तर माल साठयाचे स्टेटमेंटस घेऊन हायपॉथिकेशनचा चार्ज चढविला पाहीजे.

तारणाची पडताळणी करतांना तारण वस्तू बाजारात विकण्याची वेळ आली तर ती विकली जाईल याची खात्री करुन घेतली पाहीजे. वस्तू टिकावू आहे का? वस्तूची मालकी कर्जदाराकडे आहे का? मालाची गुणवत्ता इत्यादी गोष्टी तपासून घेतल्या पाहिजे. म्हणजे कर्जाची परतफेड झाली नाही तर वस्तूची विक्री करुन वस्तूच्या किंमतीतून कर्जाच्या रकमेची वसुली करता येते.

**४. कर्जाची रक्कम :-**

कर्जाची रक्कम ही कर्जाच्या उद्येशाला अनुसरुन योग्य असली पाहीजे. कमीत कमी कर्ज देणे हाच फक्त उद्देश नसावा. जर कर्जदाराला पुरेसे कर्ज दिले नाही तर कर्जदाराचे उद्दिष्ट पूर्ण होणार नाही. त्यातून त्याला पुरेसे उत्पन्न मिळणार नाही त्यामुळे कर्ज फेडण्यात अडचण निर्माण होईल. कर्जदाराचा स्वनिधी २५ ते ३० टक्के असला पाहिजे. अशी बँकेची अपेक्षा असली तरी तो निधी कर्जदार कर्जाच्या स्वरुपात मिळविणार असेल तर भविष्यात त्याला अडचण येण्याची शक्यता असते. अशा वेळी तो कर्जदार सर्व दृष्टीकोनातून योग्य वाटत असेल तर मार्जिनमनी कमी करुन त्याला जास्त कर्ज देणे योग्य ठरेल. मात्र कर्जाची रक्कम कर्जदार ठरलेल्या कामासाठीच वापरीत आहे याची खात्री पुढे करुन घ्यावी लागेल.

गरजेपेक्षा जास्त कर्ज बँकेने देवू नये. कारण कर्जदार अशी जास्तीची रक्कम कर्जाच्या कामासाठी न वापरता स्वत:च्या खर्चासाठी वापरण्याची शक्यता असते. म्हणून गरजे एवढेच कर्ज बँकेने मंजूर केले पाहिजे. कॅशक्रेडीटची मर्यादा गरजेएवढीच मंजुर केली पाहिजे.

कॅश क्रेडीटच्या लिमीटच्या पुढील वर्षाच्या नुतनीकरणासाठी कर्जदाराने अर्ज केल्यास कर्जदाराने मागील लिमिट पुर्ण वापरले आहे का? खात्यावरील उलाढाल मंजुर मर्यादाच्या ४ ते ५ पट वाढली का? कर्जदाराच्या खरेदी-विक्रीत वाढ झाली का? इत्यादी गोष्टी तपासून त्याला कॅशक्रेडीटचे लिमिट मंजुर करावे.

**५. कर्ज प्रकार :-**

कर्जाचे प्रमुख तीन प्रकार आहेत.

i) एक रकमी कर्ज किंवा लोन :

कर्जदाराला एखादी वस्तू खरेदी करण्यासाठी या कर्जाचा उपयोग होतो. उदा. कार खरेदी, घर खरेदी, मशिन खरेदी इत्यादी हे कर्ज एकदाच दिले जाते. ठरलेल्या हप्त्यांनी कर्जदार त्याची परतफेड करतो. या प्रकारात कर्जाचा वापर कर्जदार योग्य कामासाठीच करीत आहे. याची खात्री बॅंक करुन घेऊ शकते. कर्जदाराला मार्जिनचे पैसे बँकेत भरावयास सांगून जी वस्तू कर्जदार विकत घेणार आहे. त्या वस्तूच्या विक्रेत्याच्या नावे रेखांकित धनादेशाने पैसे देता येतात. या प्रकारात गरजेपेक्षा जास्त कर्जही दिले जात नाही बँकेला पूर्ण व्याज मिळते. त्यामुळे हा कर्ज प्रकार बँकेच्यादृष्टीने फायदेशिर असतो. कर्जाच्या पूर्ण रकमेवर व्याज द्यावे लागत असल्याने कर्जदार आवश्यक तेवढेच कर्ज घेतो.

ii) कॅशक्रेडीट :

व्यापारी वर्गाला या कर्ज प्रकाराचा उपयोग होतो. कारण त्याचा खरेदी-विक्रीचा व्यवहार सतत चालू असतो. त्यामुळे कर्जरमेचा वापर व परतफेड त्यांना पुन्हा पुन्हा करावी लागते. एकाच वेळी किती रक्कम लागेल हे निश्चित नसते. त्यामुळे गरज पडेल त्याप्रमाणे पैसे उपलब्ध व्हावे लागतात. त्यामुळे या कर्ज प्रकारात कर्जमर्यादा मंजुर करतांना बॅंकेला खुप चिकीत्सा करावी लागते. उद्योग धदाच्या व्यवहारासाठीही काही प्रमाणात लोन द्यावे लागते व खेळत्या भांडवलासाठी कॅशक्रेडीट लिमिट मंजुर करावी लागते. कॅशक्रेडीट खात्यावरील उलाढालीकडे बँकेला बारीक लक्ष ठेवावे लागते. तसेच रकमेचा गैरवापर होत नाही याची खात्री करुन घ्यावी लागते.

iii) बिलांची वटवणूक :

उद्योगांनी उत्पादित केलेला माल उधारीवर विकला जातो. उधारी वसुल व्हावी आणि मध्यंतरीच्या काळात पैशाची सोय व्हावी या दृष्टीने उद्योगसंस्था त्याच्या ऋणकोवर हुंडया काढतात. अशा हुंडया बँकांकडे वटवणूकीसाठी येतात. ही कर्जे अल्प मुदतीची असल्याने बँकांना रोखतेच्या दृष्टीने उपयुक्त ठरतात.

बिलांच्या लिमिटस् हया उद्योगसंस्थांच्या एकुण कर्ज मंजुरीतील एक भाग असतो. त्यामुळे अशा व्यवहारांवर नियंत्रण ठेवणे बँकेला शक्य होते. व्यापारी वर्गासाठीही अशा लिमिटस् मंजुर करता येतात. हया लिमिटस् देतांना कर्जदारांची गरज, पत व इतर व्यवहार बँका विचारात घेतात.

**६. कर्जाची मुदत :**

मुदतीनुसार कर्ज तीन प्रकारचे असते. एक ते दीड वर्षापर्यंतच्या मुदतीचे कर्ज हे अल्पमुदत कर्ज असते. दीड ते पाच वर्षामुदतीचे कर्ज हे मध्यम मुदतीचे कर्ज असते. तर दीर्घ मुदतीचे कर्ज कर्ज पाच ते दहा वर्ष मुदतीचे असते. दहा वर्षांपेक्षा जास्त मुदतीचे कर्ज बँकांनी देणे टाळावे. कारण बँकांनी स्वीकारलेल्या ठेवींची मुदत पाच वर्षांपेक्षा जास्त नसते. तसेच जास्तीत जास्त ठेवी एक ते तीन वर्षांपर्यंत देय होतात.

कॅशक्रेडीट कर्जाची मुदत एक वर्षाची असते आणि कर्जदाराला या कर्जाचे दरवर्षी नुतनीकरण करावे लागते.

लोन स्वरुपाच्या कर्जाची मुदत ठरवितांना कर्जाच्या रकमेचा आणि कर्ज परतफेडीच्या कर्जदराच्या क्षमतेचा विचार करावा लागतो. कर्जदाराला कर्ज उपलब्ध झाल्यामुळे कर्जदाराला त्यापासून जे वाढीव उत्पन्न मिळते त्यातून त्याचे खर्च वजा जाता कर्जाची परतफेड करण्यासाठी किती रक्कम शिल्लक उरते हे पाहून त्या मर्यादेपर्यंत हप्त्याची रक्कम किती कालावधी लागेल हे विचारात घेऊन कर्ज फेडीची मुदत ठरवावी लागते. फक्त कर्जफेड विशिष्ट कालावधीतच झाली पाहीजे एवढाच विचार करुन कर्जाचा हप्ता (मुद्दल + व्याज) ठरविला आणि तो कर्जदराच्या परतफेडीच्या क्षमतेपेक्षा जास्त झाला तर काही काळाने हप्ते भरले न जाण्याची शक्यता असते.

काही वेळेस कर्जफेडीच्या हप्त्यांची रक्कम समान न ठेवता थोडा व्यवहारी दृष्टीकोन वापरणे आवश्यक असते. उदा. वाहन कर्ज देतांना सुरवातीला वाहनाला दोन ते तीन वर्ष देखभालीचा खर्च करावा लागत नसल्याने सुरवातीला जास्त रकमेचे हप्ते ठरवावे नंतर हप्ताची रक्कम कमी करावी यामुळे कर्जदाराला हप्ते भरता येतात.

अशा कर्जाची मुदत फार जास्त नसावी. कारण वाहनांची किंमत दर वर्षी कमी कमी होत जाते. कर्जदाराने हप्ते भरणे थांबविले तर वाहनाची विक्री करुन शिल्लक कर्जाची वसुली करता आली पाहिजे. तसेच कर्जाचा हप्ता उत्पन्न येईल ती सोईची तारीख द्यावी म्हणजे हप्ता चुकत नाही.

**७. कर्जावरील व्याजदर :**

सध्या कर्जावरील व्याजदरावरील रिझर्व्ह बँकेची नियंत्रणे शिथील करण्यात आली आहेत. परंतु याबाबत रिझर्व्ह बँक वेळोवळी काही मार्गदर्शक सूचना बँकांना देते. त्याचे पालन व्यापारी बँकांना करावे लागते. म्हणून बँकांनी कर्ज देतांना कर्जदाराच्या कर्जाच्या कागदपत्रांवर व्याजदराच्या संदर्भात रिझर्व्ह बँक वेळोवळी जो आदेश देईल त्याप्रमाणेच त्या कर्जावरील व्याजदरात फेरफार करण्याचा अधिकार बँकेने राखुन ठेवला आहे. या संदर्भात बँकींग रेग्युलेशन ॲक्टच्या कलम २१(ए) मधील तरतुदी बँकांना संरक्षण देतात.

बँकेने कर्ज व्यवहाराच्या संदर्भात मुलभूत कर्ज दर (प्राईम लेडींग रेट) ठरविला पाहिजे. हा किमान दर असतो. हा ठरविण्याचा अधीकार बँकेच्या बोर्ड ऑफ डारेक्टर्सला असतो. तसेच त्यात बदलही करता येतो. त्यानुसार वेगवेगळया कर्जावरील व्याजदर ठरविता येतात. कर्जावर व्याजदर आकरणी सध्या दर महीन्याला करण्याची परवानगी रिझर्व्ह बँकेने दिली आहे.

व्याज आकारण्याच्या बाबतीत रिझर्व्ह बँक वेळोवळी आपले धोरण जाहीर करते. त्यानुसार व्यापारी बँका आपल्या व्याजदरात बदल करतात.

**८. कर्जाच्या अटी :**

कर्ज प्रकरणाची सर्व बाजूंनी छाननी केल्यानंतर कर्ज मंजुरीस हरकत नाही असे असे मत झाल्यानंतर कर्जाच्या अटींचा विचार केला पाहिजे. कर्जाची सुरक्षितता, रोखता व लाभता इत्यादी गोष्टींची खात्री करण्यासाठी कर्जदाराकडून काही अटी मान्य करुन घेणे आवश्यक असते. सर्वसाधरण कर्ज मंजुरीसाठी खालील अटी घातल्या जातात.

१) कर्ज ज्या कारणासाठी मंजुर केले आहे त्यासाठीच त्याचा वापर करावा.

२) कर्ज परत फेडीला विशीष्ट मुदत दिली असली तरी बँकेचा मुदतपूर्व सर्व कर्ज वसुलीचा अधिकार कर्जदाराने मान्य करावा.

३) कर्जासाठी दिलेल्या तारणाच्या किंमतीवर जे अंतर (मार्जिन) ठरले असेल ते सतत राखुन ठेवावे.

४) कर्जावरील व्याजदर बँक नियमाप्रमाणे राहील. प्रत्येक महिन्याला व्याज आकारले जाईल ते वेळेवर भरले पाहिजे.

५) कर्जाचे ठरलेले हप्ते वेळेवर भरले पाहिजे.

६) कर्जदाराने दिलेल्या तारणावर बँकेचे जनरल लिन राहील.

७) कर्जदाराने बँकेला मान्य होतील असे एक किंवा दोन जामिनदार द्यावेत.

८) कर्जाची उचल करण्यापूर्वी बँकेच्या नियमाप्रमाणे सर्व कायदेशीर कागदपत्रे पूर्ण करुन दिली पाहिजे.

९) कर्जदाराने बँकेला तारण न दिलेल्या खाजगी मालमत्तेवर कोणताही बोजा निर्माण करण्यापूर्वी बँकेची संमती घेतली पाहिजे.

कर्जाचा उद्येश कर्जदाराची पत, कर्जाची रक्कम इत्यादी गोष्टी विचारात घेऊन वरील अटींपैकी योग्य अटी घालण्यात याव्या. थोडक्यात बँकांनी कर्जदाराची सर्वांगीण योग्यप्रकारे छाननी केल्यास व कर्जदाराच्या अडचणी समजून घेतल्यास योग्यवेळी, योग्य प्रमाणात कर्ज उपलब्ध करुन दिल्यास व परतफेडीची योग्य मुदत, योग्य तारीख दिल्यास आणि शक्यतोवर योग्य मुदतीची कर्जे उपलब्ध करुन दिल्यास निश्यितपणे कर्जदारांची कर्जाची गरज भागविली जाईल. कर्जाची योग्य वेळी परतफेड होईल. बँकांना आपली सुरक्षितता, रोखता आणि लाभतेचा चांगल्या प्रकारे मेळ घालता येईल आणि बँक व्यवसायाचा विकास होऊन बँका देशाच्या आर्थिक विकासासाठी महत्वाची भूमिका बजावतील यात शंका नाही.

**संदर्भ :**

१. तळेकर, शंकर व काबरा, जवाहर (२००५) *भारतीय बँकींग व्यवस्था.* औरंगाबाद : चिन्मय प्रकाशन.

२. बोधनकर, सुधिर व कानेटकर, मेधा (२००६) : *भारतीय बँकींग प्रणाली.* नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन.

३. Shekhar K.E. and Shekhar, Lekshmy (१९९७). *Banking Theory and Practice.* Delhi : Vikas Publishing House.

४. E. Gorden and K. Natarajan (२००१) *Banking -Theory Law and Practice.* Delhi : Himalaya Publishing House.

५. मानकर, सुधाकर व डांगे, अशोक (२०००) *प्रगत बँकींग.* कोल्हापूर : फडके बुक हाऊस.

६. Shrivastav R.M. (१९८४) *Management of Indian Financial Institutions.* Delhi : Himalaya Publishing House.

७. बापट वि.वि., बँक व्यवहारकोश.

८. बँक अधिकाऱ्याच्या मुलाखतीतून मिळालेली माहिती.